**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**
(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : jd.hesss-mh@gov.in

शिशुस/बैठक इतिवृत्त/२०२३-२४/२०२४/२२६ दि.२३-०८-२०२४

प्रति,
प्राचार्य,
राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित
शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये

**विषय:-शिक्षण शुल्क समितीच्या दि.१४-०८-२०२४ च्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत.**

महाविद्यालयांच्या सन २०२४-२५ च्या शुल्क निश्चितीबाबत शिक्षण शुल्क समितीची बैठक दि.१४-०८-२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. उपरोक्त बैठकीचे इतिवृत्त उचित कार्यवाहीस्तव सोबत पाठविण्यात येत आहेत.

सोबतच्या इतिवृत्तातील परिशिष्टात नमूद शिक्षण शुल्काबाबत महाविद्यालयांना आक्षेप असल्यास अशी महाविद्यालये योग्य त्या अभिलेख/कागदपत्रासह ८ दिवसात समितीकडे आक्षेप सादर करू शकतील. समितीच्या पुढील बैठकीत सदर आक्षेप सादर करण्यात येतील.

Signed by
Harivijay Ganpatrao Shinde
Date: 23-08-2024 16:13:12
**(हरिविजय शिंदे)**
**सहसंचालक,**
**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर-**

**१.मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२**
**२.मा. सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१**

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय

## शिक्षण शुल्क समिती, मुंबई

(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : jd.hesss-mh@gov.in

## शिक्षण शुल्क समितीच्या दि.१४-०८-२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

शिक्षण शुल्क समितीची बैठक **दि.१४-०८-२०२४ रोजी स.११.०० वाजता** मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीस खालील सदस्य/अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | **अध्यक्ष** |
| २ | मा.श्री. बबन माळी, उपसचिव, वित्त विभाग (मा.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी) | **सदस्य** |
| ३ | डॉ. श्रीनिवास धुरे, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | **सदस्य** |
| ४ | डॉ. नलिनी पाटील-सदस्य. खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचा प्रतिनिधी (शिक्षणशास्त्र) तथा प्राचार्य, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे | **सदस्य** |
| ५ | डॉ. महेश देशपांडे - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारीरिक शिक्षणशास्त्र) तथा सहयोगी प्राध्यापक, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे | **सदस्य** |
| ६ | मा. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, प्र. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे (ऑनलाईन उपस्थिती) | **सदस्य सचिव** |
| ७ | श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | **सदस्य** |

तसेच बैठकीस खालील विशेष निमंत्रित उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित विशेष निमंत्रित | पदनाम |
|---|---|---|
| ८ | श्री. एस. ए. सोनवणे, सहयोगी प्राध्यापक, सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज ऑफ एज्युकेशन, मुंबई | **शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ** |

SHIKSHAN SHULKA SAMITI * MUMBAI *

| | | |
|---|---|---|
| ९ | डॉ.राजेंद्र ढाकणे, सह.प्राध्यापक, शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मुंबई | **शारीरिक शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ** |
| १० | श्रीमती वैशाली बापट, खर्च लेखापाल, वांद्रे (पूर्व), मुंबई | **प्रस्ताव तपासणी खर्च लेखापाल** |
| ११ | श्री. कैलाश गांधी, खर्च लेखापाल,मे.कैलाश गांधी ॲन्ड असोसिएट्स, वाशी, नवी मुंबई | **प्रस्ताव तपासणी खर्च लेखापाल** |
| १२ | डॉ. श्रीनिवास दराडे, संस्था प्रतिनिधी, कामधेनू शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर | **निमंत्रित सदस्य** |

श्री. व्ही. बी. शर्मा- सनदी लेखापाल तथा व्ही. बी. शर्मा ॲन्ड कं, चार्टर्ड अकाऊन्टन्ट्स गोंदिया यांनी बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत ईमेलवरून कळविले आहे.

बैठकीच्या सुरूवातीस सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती तथा सदस्य यांनी उपस्थितांचे स्वागत करून बैठकीच्या आयोजनाबाबतची प्रस्तावना केली. सदर बैठकीत विषयपत्रिकेनुसार खालील विषयाबाबत चर्चा व निर्णय झाले.

**विषय क्र.०१:- राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या शै. वर्ष २०२४-२५ करिताच्या तज्ज्ञांकडून तपासणी झालेल्या २९३ महाविद्यालयाच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

सन २०२४-२५ करिता शुल्क निश्चितीकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी तज्ज्ञांकडून तपासून प्राप्त झालेले २९३ प्रस्ताव समितीपुढे शुल्क निश्चितीसाठी सादर करण्यात आले. शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१.२ Salary of Employees (Teaching &Non- teaching) paid through Bank Accounts only will be considered for calculation of fee. salary paid in cash will be disallowed. असे नमुद केलेले आहे. या नियमाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी वेतनावरील खर्च हा पूर्णत: बँकेमार्फत करणे आवश्यक होते. महाविद्यालयाच्या बँकेमार्फत अदा केलेल्या वेतनाच्या अनुषंगाने परिगणना करून आलेले शुल्क किंवा समितीने निश्चित करून दिलेल्या अंतिम मंजूर शुल्कात २० टक्के वाढ करून आलेले शुल्क यापैकी जे कमी असेल ते शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

तसेच ज्या महाविद्यालयांनी विकास शुल्क, विकास योजना व विकास शुल्क जमा करण्याकरिता नवीन बँक खाते क्रमांक सादर केला आहे, अशाच महाविद्यालयांचे विकास शुल्क(Devlopment Fee) मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. अंतिम मंजूर शिक्षण व विकास शुल्क परिशिष्टनिहाय नमुद केलेले आहे.

**परिशिष्ट अ -बी.एड- २४५ महाविद्यालये**
**परिशिष्ट ब-एम.एड- २० महाविद्यालये**
**परिशिष्ट क-बी.पी.एड- १९ महाविद्यालये**

**परिशिष्ट ड-एम.पी.एड- ०६ महाविद्यालये**

१.१ २९३ महाविद्यालयापैकी एका महाविद्यालयाचा प्रस्ताव अपूर्ण अभिलेख असल्याने पुढील बैठकीत ठेवणेबाबत निर्णय घेण्यात आला.

१.२ महाविद्यालयांनी उपरोक्त प्रमाणे मंजूर झालेले शुल्क महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड (Upload) करावे आणि विद्यार्थ्यांकडून तेवढेच शुल्क आकारावे. तसेच **शुल्क नियमावलीतील नियम क्र.१.४ (e) नूसार While calculating the fee committee has considered all the expenses including Eligibility Fee,University Fee, Laboratory Fee, Library Fee, Gymkhana Fee, Information Brochure Fee, etc therefore the colleges should not collect any fee other than the Tuition Fee & Development Fee approved by S.S.S. नुसार शुल्क निश्चिती करताना समितीने उपरोक्त खर्च विचारात घेतलेले आहेत. त्यामुळे महाविद्यालयाने समितीने निश्चित करून दिलेल्या शिक्षण शुल्क व विकास शुल्क याव्यतिरिक्त इतर शुल्क आकारू नये, असे बैठकीत ठरविण्यात आले.**

त्यामुळे महाविद्यालयांनी समितीने निश्चित करून दिलेले शिक्षण व विकास शुल्क याशिवाय इतर शुल्क आकारू नये, तसेच विद्यापीठांनी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांकरिता परिक्षा शुल्क वगळता इतर शुल्क निश्चित न करणेबाबत मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत सर्व विद्यापीटांना कळविण्यात यावे, असा निर्णय झाला. तसेच विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण सन २०२४-२५ पासून विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांचे इतर शुल्कास MahaDBT Portal वर मंजूरी देण्यात येवू नये, असे मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत कळविण्यात यावे, असा निर्णय झाला.

**१.३** उपरोक्त परिशिष्ट क्र. ब मधील २२ महाविद्यालयांपैकी शासकीय अध्यापक महाविद्यालयात विनाअनुदानित तत्वावर चालविण्यात येत असलेल्या व सदर बैठकीत विचारार्थ ठेवलेल्या ०२ स्वयंसहाय्यित एम.एड अभ्यासक्रमाच्या तसेच उर्वरित शासकीय महाविद्यालयांच्या एम.एड अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक घेवून बैठकीचा अहवाल (प्रस्तावित शुल्क नमूद करून) समितीच्या पुढील बैठकीत सादर करावा, असा निर्णय झाला.

**विषय क्र.०२ अल्पसंख्याक महाविद्यालयांच्या सन २०२४-२५ करिताच्या तज्ज्ञांकडून पडताळणी झालेल्या २३ महाविद्यालयांच्या पडताळणीनुसार आलेल्या शुल्कास मान्यता मिळणे.**

सन २०२४-२५ करिता शुल्क निश्चितीकरिता प्राप्त झालेल्या अल्पसंख्याक महाविद्यालयांच्या प्रस्तावांपैकी खर्च लेखापालांकडून तपासून प्राप्त झालेले २३ प्रस्ताव समितीपुढे शुल्क पडताळणीसाठी सादर करण्यात आले. प्रचलित नियमावलीतील तरतूदींनूसार तज्ज्ञांकडून तपासून घेण्यात आले.

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI, MUMBAI

शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१.२ Salary of Employees (Teaching &Non- teaching) paid through Bank Accounts only will be considered for calculation of fee. salary paid in cash will be disallowed. असे नमुद केलेले आहे. या नियमाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी वेतनावरील खर्च हा पूर्णत: बँकेमार्फत करणे आवश्यक होते. महाविद्यालयाच्या बँकेमार्फत अदा केलेल्या वेतनाच्या अनुषंगाने परिगणना करून आलेले शुल्क किंवा समितीने यापूर्वी मंजूर करून दिलेल्या पडताळणी करून दिलेले अंतिम मंजूर शुल्कात २० टक्के वाढ करून आलेले शुल्क यापैकी जे कमी असेल ते शुल्क पडताळणी करून आलेले शुल्क म्हणून अंतिम करणेबाबत, निर्णय घेण्यात आला.

सदर महाविद्यालयांचे शुल्क निश्चितीचे अधिकार अबाधित असतानाच शिष्यवृत्तीसाठी शुल्क पडताळणी करत असताना सर्व नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. पडताळणी करून आलेले शिक्षण व विकास शुल्क परिशिष्टात नमुद केलेले आहे.

**परिशिष्ट अ १ -बी.एड- २३ महाविद्यालये**

**विषय क्र.०३ अल्पसंख्याक महाविद्यालयांच्या सन २०२२-२३ करिताच्या तज्ज्ञांकडून पडताळणी झालेल्या ०३ महाविद्यालयाच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

सन २०२२-२३ मध्ये ज्या अल्पसंख्याक महाविद्यालयांनी शुल्क पडताळणीकरिता अभिलेख सादर केले नव्हते. अशा महाविद्यालयांपैकी ०३ महाविद्यालयांकडून शुल्क पडताळणीकरिता समितीकडे प्रस्ताव प्राप्त झाले. सदर प्रस्तावांची खर्च लेखापालांकडून पडताळणी करण्यात आली व सदर ३ प्रस्ताव समितीपुढे शुल्क पडताळणीसाठी सादर करण्यात आले.

शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१.२ Salary of Employees(Teaching &Non-teaching)is to be paid through Bank Accounts only. असे नमुद केलेले आहे. या नियमाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी वेतनावरील खर्च हा पूर्णत: बँकेमार्फत करणे आवश्यक आहे. तथापि, काही महाविद्यालयांनी याचे पालन केलेले नाही. सदर महाविद्यालयांचे शुल्क निश्चितीचे अधिकार अबाधित असतानाच शिष्यवृत्तीसाठी शुल्क पडताळणी करत असताना सर्व नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. सदर महाविद्यालयांच्या बँकेमार्फत अदा केलेल्या वेतन खर्चानूसार परिगणना करून आलेले शुल्क किंवा समितीने अंतिम मंजूर शुल्कात २० टक्के वाढ करून आलेले शुल्क यापैकी जे कमी असेल त्या शुल्काच्या मर्यादेत महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या शुल्कास मंजूरी देणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**परिशिष्ट अ२ बी.एड - ३ महाविद्यालये**

**विषय क्र.०४ मागील बैठकीत अल्पसंख्याक महाविद्यालयांच्या पडताळणी झालेल्या शुल्काबाबत प्राप्त अपिलावर मा.संचालक, उच्च शिक्षण यांनी घेतलेल्या सुनावणीचा अहवाल समितीच्या विचारार्थ सादर.**

:-शिक्षण शुल्क समितीने सन २०२२-२३ मध्ये अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या शुल्क पडताळणी करून दिलेल्या महाविद्यालयांपैकी ७ महाविद्यालयांच्या शुल्कात खुप जास्त प्रमाणात घट

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI * MUMBAI *

झाली होती. त्यापैकी ६ महाविद्यालयांनी मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे अपील अर्ज सादर केला होता. दि.२२.०४.२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सुनावणीत ४ महाविद्यालयांचे प्रतिनिधी हजर होती. तसेच त्यानंतर प्राप्त झालेल्या २ अपीलावर दि.०१.०७.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. या सुनावणीचा अहवाल समितीच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता. सुनावणीतील निर्णयानूसार ४ महाविद्यालयांनी सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन विहीत नियमानूसार बँकेमार्फत करणेबाबत हमीपत्र समितीकडे सादर केले. यावर समितीत सविस्तर चर्चा होवून झालेल्या निर्णयानूसार महाविद्यालयांनी बँकेमार्फत वेतन अदा झाल्यानंतर समितीकडे प्रस्ताव सादर करून शुल्क पडताळणी करून घ्यावी. तसेच समितीच्या यापूर्वीच्या बैठकीत पडताळणी करून आलेले शुल्कच शिष्यवृत्तीकरिता मंजूर करून देण्यात यावे असा निर्णय झाला.

**विषय क्र.०५ अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.**

**५.१** जी महाविद्यालये काही कारणास्तव बंद होती किंवा सन २०२३-२४ ला उशिरा चालू झालेली महाविद्यालये ज्यामुळे ऑडीट पूर्ण करू शकली नाहीत किंवा सन २०२३-२४ ला सूरू झालेली महाविद्यालये परंतू तांत्रिक कारणास्तव विद्यार्थ्यांना पोर्टलवर महाविद्यालयाचे नाव न दिसल्यामुळे विद्यार्थी मिळाले नव्हते तसेच यावर्षी नव्याने सुरू होणारी महाविद्यालये इ. महाविद्यालयांनी शासकीय महाविद्यालयांना लागू असलेले शुल्क सन २०२४-२५ करिता मंजूर करून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यानूसार खालील यादीतील बी.एड. अभ्यासक्रमांस शासकीय दरानूसार लागू असलेले शुल्क तसेच एम.एड अभ्यासक्रमांस शासकीय अध्यापक महाविद्यालयातील विनाअनुदानित तत्त्वावरील अभ्यासक्रमांस लागू असलेले शुल्क **फक्त सन २०२४-२५ करिता अंतरिम शुल्क** म्हणून मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. सदर महाविद्यालयांनी लेखापरिक्षण अहवाल तयार झाल्यावर शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील, त्यानूसार होणारी शुल्क निश्चिती ही अंतिम असेल.

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव | अंतरिम मंजूर शिक्षण शुल्क प्रतिवर्ष |
|---|---|---|
| १ | श्रीराम महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बी.एड), पानीव, ता.माळशिरस जि. सोलापूर | रू.१४,५९५/-प्रतिवर्ष (मागणीप्रमाणे) |
| २ | बी.जी.पटले कॉलेज ऑफ एज्यूकेशन(बी.एड.)तिरोडा, जि. गोंदिया (बी.एड) | रू.१५,३२५/-प्रतिवर्ष |
| ३ | संत गजानन अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड (बी.एड) | रू.१५,३२५/-प्रतिवर्ष |
| ४ | सिध्द लहरनाथ वूमन्स ऑफ एज्यूकेशन, उल्हासनगर, जि. ठाणे (बी.एड) | रू.१५,३२५/-प्रतिवर्ष |
| ५ | राजनारायण ओझा मेमोरिअस ट्रस्टचे सिध्दाई बी.एड कॉलेज,अंबाडी, जि. ठाणे (बी.एड) | रू.१५,३२५/-प्रतिवर्ष |

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI, MUMBAI

| | | |
|---|---|---|
| ६ | जनता शिक्षण प्रसारक समितीचे पंडित राजपती मिश्रा कॉलेज ऑफ एज्युकेशन अॅन्ड रिसर्च, ठाणे (एम.एड) | रू.२०,०००/- प्रतिवर्ष |

**५.२ अ.** सर्वोदय ग्रामीण विकास संस्थेचे राजर्षी शाहू अध्यापक महाविद्यालय, अंबाजागाई, जि. बीड यांनी शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.१.५ बाबत मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती केली होती. सदर नियमाबाबत समितीमध्ये चर्चा झाली. तथापि, काही महाविद्यालयांच्या प्रस्ताव सादर करणेबाबत येणाऱ्या अडचणी विचारात घेता, नियमावलीत मुद्दा क्र.१.५ चा समावेश करण्यात आला होता. शासन निर्णय दि.०५.०७.२०१३ मधील **समितीच्या जबाबदाऱ्या** या मुख्य शिर्षातील मुद्दा क्र.१० मधील, "समितीने निश्चित केलेले शुल्क हे पुढील तीन वर्षासाठीच लागू राहील. त्यानंतर पुढील कालावधीसाठी हे शुल्क पुन्हा निश्चित करून घ्यावे लागेल."असे नमुद आहे. त्याअनुषंगाने नियमावलीतील १.५ बाबत चर्चा होवून त्यामध्ये खालीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक सुधारणा करण्यास समितीने मान्यता दिली व मुद्दा क्र.१.५ ऐवजी

1.5 The College/Institute can continue to charge the fees approved by the shikshan shulk samiti for a consecutive peried of three years only from the academic years for which the fee is approved by the samiti.(For example if the fee is approved for the academic year 2021-22 then the college can continue to charge this fee for the academic year 2022-23 and academic year 2023-24 only)

हा बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**ब.** खालील महाविद्यालयांनी काही तांत्रिक कारणास्तव प्रस्ताव सादर करू शकत नसल्यामुळे सन २०२१-२२ चे शुल्क सन २०२४-२५ मध्ये आकारण्यास उपरोक्त नियमाच्या अनुषंगाने विनंती केलेली आहे. शिक्षण शुल्क समितीच्या शासन निर्णय दि.०५.०७.२०१३ मधील **समितीच्या जबाबदाऱ्या** या मुख्य शिर्षातील मुद्दा क्र.१० मधील, "समितीने निश्चित केलेले शुल्क हे पुढील तीन वर्षासाठीच लागू राहील. त्यानंतर पुढील कालावधीसाठी हे शुल्क पुन्हा निश्चित करून घ्यावे लागेल."असे नमुद आहे. त्यामुळे महाविद्यालयांची विनंती मान्य करता येत नाही, सबब, खालील महाविद्यालयांना सन २०२४-२५ करिता शुल्क निश्चीतीचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात यावे, असा निर्णय झाला.

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|
| १ | राजर्षी शाहू अध्यापक महाविद्यालय, अंबाजागाई, जि. बीड |
| २ | जयप्रकाश नारायण अध्यापक महाविद्यालय, छ.संभाजीनगर |
| ३ | के.जी.एस.बी.एड, कॉलेज, शहापूर, जि. ठाणे |

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI, MUMBAI

**क.** ज्या महाविद्यालयांनी अद्याप प्रस्ताव सादर केले नाहीत, अशा महाविद्यालयांना सन २०२४-२५ करिता प्रस्ताव सादर करणे शासन निर्णयातील तरतुदींनूसार बंधनकारक आहे. उर्वरित सर्व महाविद्यालयांना सन २०२४-२५ करिता शुल्क निश्चीतीचा प्रस्ताव १५ दिवसांत सादर करणेबाबत कळविण्यात यावे, असा निर्णय झाला.

**५.३** शिक्षणशास्त्र तज्ज्ञ यांनी प्रस्ताव तपासणीचे मानधन वाढविण्याबाबत समितीस विनंती केलेली आहे, ही बाब समितीच्या विचारार्थ सादर करण्यात आली, यावर समितीत सविस्तर चर्चा होवून याबाबत शिक्षण शुल्क समितीने प्रस्ताव तयार करून संचालनालयास सादर करण्यात यावा, असे ठरले.

**५.४** समितीकडे प्राप्त प्रस्ताव छाननी/तपासणीकरिता खर्च लेखापाल/सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्यात येते. सदरचे प्रस्ताव तपासणीकरिता ४५०/- मानधन निश्चित करण्यात आलेले होते. समितीचे खर्च लेखापाल यांनी शुल्क नियामक प्राधिकरण, बांद्रा येथे प्रति प्रस्ताव १०००/- मानधन मिळत असल्याच्या धर्तीवर शिक्षण शुल्क समितीमध्ये सुध्दा प्रस्ताव छाननी/तपासणी मानधनात वाढ करण्याची मागणी समितीस केली, त्यावर समितीत सविस्तर चर्चा होवून शिक्षण शुल्क समितीकडे प्राप्त होणारे प्रस्ताव छाननी/तपासणी करण्याकरिता खर्च लेखापाल/ सनदी लेखापाल यांना प्रति प्रस्ताव रू.९००/- मानधन अदा करणेबाबत निर्णय होवून शिक्षण शुल्क समितीने प्रस्ताव तयार करून संचालनालयास सादर करण्यात यावा, असे ठरले.

**५.५** समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.११.१ नूसार infrastructure facilities/amenities इत्यादी बाबी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे, मुद्दा क्र.२.१४.१ नूसार Computation sheet हे महाविद्यालयाच्या सूचना फलक व संकेतस्थळावर प्रसिध्द करणे, मुद्दा क्र.**२.१५.१** शुल्क निश्चितीसाठी सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत विद्यार्थी व पालकांसाठी महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध करून देणे तसेच मुद्दा **क्र.२.१५.२** नूसार शिक्षण शुल्क समितीने निश्चित करून दिलेले अंतिम शुल्क महाविद्यालयाच्या सूचना फलकावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करणे या नियमावलीतील तरतूदीचे पालन करणेबाबत महाविद्यालयांना कळविण्यात यावे, असा निर्णय झाला.

**५.६** ज्या महाविद्यालयांचे शुल्क कमी होत आहे/मागणी कमी केलेली आहे, अशा महाविद्यालयांना विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत भेटी देवून वस्तूस्थिती दर्शक अहवाल सादर करणेबाबत मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत कळविण्यात यावे, असे ठरले.

**५.७** महाविद्यालयाकडून शुल्क निश्चितीकरिता सादर केलेल्या प्रस्तावातील प्राप्त झालेली विद्यार्थीहितार्थ महत्त्वाची असलेली माहिती शिक्षण शुल्क समितीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी, असा निर्णय झाला.

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI, MUMBAI

उपरोक्त परिशिष्टात नमूद शिक्षण शुल्काबाबत महाविद्यालयांना आक्षेप असल्यास अशी महाविद्यालये योग्य त्या अभिलेख/कागदपत्रासह ८ दिवसात समितीकडे आक्षेप सादर करू शकतील. समितीच्या पुढील बैठकीत सदर आक्षेप सादर करण्यात येतील.

मा.अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांनी उपस्थितांचे आभार मानले व सदर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्र.संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

# शिक्षण शुल्क समिती, मुंबई

SSSMEETING DT.14.08.2024

महाविद्यालयांना सन 2024-25 करिता मंजूर करण्यात आलेले शुल्क-बी. एड. परिशिष्ट -अ

| अ.क्र | प्रस्ताव क्र | महाविद्यालयाचे नाव | एकुण २ वर्षाचे शिक्षण शुल्क | शिक्षण शुल्क प्रतिवर्ष | विकास शुल्क प्रतिवर्ष |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | B A Alias Bhaisaheb Sawant Adhypak Mahavidyalay ,At.Po.Sawarde Tal.Chiplun Dist. Ratnagiri | 12646 | 6323 | 0 |
| 2 | 2 | Mahila Shikshanshatra Mahavidyalaya Tarwade(Peth) ,Jalgaon | 38626 | 19313 | 0 |
| 3 | 3 | Late.A.M.Patil Public Education Society'S Smt.Mankarnabai Vinayakrao Marathe Womens College Of Education Tal Sakri Dist .Dhule | 30034 | 15017 | 0 |
| 4 | 4 | Matoshri Asarabai Darade Womens College Of Education ,Babhulgaon Tal-Yeola,Dist Nashik | 54054 | 27027 | 0 |
| 5 | 5 | Sindhudurg Education Society'S V.Y.S.B.Ed.College, Tal Kankavli, Dist Sindhudurg - 416601 | 31516 | 15758 | 1576 |
| 6 | 6 | Adhyapak Mahavidyalaya Bharne,At Post Bharne Tal Khed, Dist Ratnagiri | 28860 | 14430 | 0 |
| 7 | 7 | Prabhakar Patil Education Society'S B.Ed College , Veshvi Alibag,Dist-Raigad | 29106 | 14553 | 1456 |
| 8 | 8 | Smt.Kashibai Navale College Of Education B.Ed.,At Post Kamlapur, Dist Solapur | 62370 | 31185 | 0 |
| 9 | 9 | Smt.Geeta Bankar Women'S College Of Education, Sangola,Dist -solapur | 41580 | 20790 | 0 |
| 10 | 10 | Gayatri College Of Education,Deolali Pravara, Tal. Rahuri, Dist. Ahmednagar | 44834 | 22417 | 0 |
| 11 | 11 | Genba Sopanrao Moze Adhyapak Mahavidhyalaya, Near Magzine Chowk,Pune | 19896 | 9948 | 0 |
| 12 | 12 | Janseva Shikshan Mandal'S College Of Education , Taluka Murbad, District Thane | 51703 | 25852 | 2973 |
| 13 | 13 | Ichalkaranji Shikshanshastra Mahavidyalay,Ichalkaranji,Dist-Kolhapur | 51282 | 25641 | 0 |
| 14 | 14 | Pramod Ravindra Dhuri Adhyapak Mahavidyalaysalgaon,Salgaon,Dist - Sindhudurg | 33084 | 16542 | 1732 |
| 15 | 15 | Sanjivani Pratishthan College Of Education,Post-Ralegan Therpal Taluka-Parner Dist-Ahmednagar | 36442 | 18221 | 0 |

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI * MUMBAI *

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 16 | 16 | S.N.D. College Of Education ,At-Babhulgaon Tal- Yeola Dist- Nashik | 66871 | 33436 | 0 |
| 17 | 17 | Gramonnati Mandals B.Ed College, Narayangaon Tal - Junnar, Dist - Pune Pin 410504 | 49896 | 24948 | 0 |
| 18 | 18 | Vidya Pratishthan'S, College Of Education,Vidyanagari, Baramati, Dist-Pune | 71352 | 35676 | 3639 |
| 19 | 19 | Sant Dnyaneshwar B.Ed. College,Bhanshiware, Tal- Newasa, Dist-Ahmednagar | 38830 | 19415 | 1942 |
| 20 | 20 | Shree Bhimashankar B. Ed. College,At/Post-Landewadi (Manchar), Tal-Ambegaon, Dist-Pune | 39030 | 19515 | 1952 |
| 21 | 21 | Vasantrao Naik Shikshanshastra Mahavidyalaya,,853, Vidya Vasant Park, Bapuram Nagar, Kalamba Kolhapur | 43628 | 21814 | 2291 |
| 22 | 22 | Appasaheb Birnale College Of Education (B.Ed),Near Railway Station, Shinde Mala, Sangli | 41580 | 20790 | 0 |
| 23 | 23 | Raireshwar Dongari Vikas Parishad'S Adhyapak Mahavidyalaya, Dhankawadi Pune-43. | 63202 | 31601 | 0 |
| 24 | 24 | Konkan Agriculture Education And Research Institute,dr .Tanajirao chorage adhyapak mahavidhyalay mandki,Mandki-Palvan Tal -Chiplun Dist- Ratnagiri | 26175 | 13088 | 0 |
| 25 | 25 | Maeer'S Mit Saint Dnyaneshwar B.Ed. College,Alandi,Dist-pune | 27720 | 13860 | 0 |
| 26 | 26 | Dr.D.S.Aher B.Ed College ,Vithewadi Lohoner Tal-Deola Dist-Nashik | 14876 | 7438 | 0 |
| 27 | 27 | Dhareshwar Shikshanshastra Mahavidyalaya, Indraprastha Nagar Dhayari Pune 41041 | 47402 | 23701 | 0 |
| 28 | 28 | M.S.V.M'S New College Of Education ,Bhor Township, Chunchale Shiwar, Dist.Nashik | 54886 | 27443 | 0 |
| 29 | 29 | Uma Shikshanshastra Mahavidyalya (B.Ed.) , Road Pandharpur,Dist-Solapur | 55585 | 27793 | 3196 |
| 30 | 30 | Shikshanshastra Mahavidhyalay ,Abhona Tal Kalwan Dist Nashik | 51196 | 25598 | 0 |
| 31 | 31 | Sou Nirmalatai Thopate College Of Education Bhor,Dist-Pune | 44152 | 22076 | 2252 |

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI